# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# गुरुवार, दिनांक ०४ जुलै २०२४
## ठळक बातम्या

1. **महाराष्ट्रात, आगामी राज्य विधानसभा निवडणुकीच्या आधी, निवडणूक आयोगानं मतदार याद्यांची विशेष सारांश उजळणी केली जाहीर.**
2. **राज्यात वाचन चळवळीला चालना देण्यासाठी नव्यानं सहा ते सात हजार ग्रंथालयं सुरू करण्यात येणार- तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची विधानपरिषदेत माहिती**
3. **निती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत यवतमाळच्या 'झरी - जामणी' मध्ये संपूर्णता अभियानाचं उद्घाटन - विदर्भातील ६ जिल्ह्यांचा समावेश.**
4. **माजी मंत्री सुनील केदार यांचा दोषसिद्धीला स्थगितीची मागणी करणारा अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं फेटाळला.**

*****

सारांश उजळणी

महाराष्ट्रात, आगामी राज्य विधानसभा निवडणुकांच्या आधी, निवडणूक आयोगानं मतदार याद्यांची विशेष सारांश उजळणी जाहीर केली आहे. याअंतर्गत, मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रं स्थापन करण्यावर निवडणूक आयोगाचा भर राहील. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष आणि सचिवांना बूथ-स्तरीय स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येईल. या स्वयंसेवकांना पात्र मतदारांची नावे अद्ययावत करण्याचं आणि सोसायटी सोडून गेलेल्या किंवा सोसायटीतील मृत व्यक्तींची नावे काढून टाकण्याचे काम दिलं जाईल. सोसायटी Google फॉर्मद्वारे निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज देखील सादर करू शकते. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी गृहनिर्माण सोसायट्यांना मतदारांसाठी सोयीस्कर आणि जवळच्या ठिकाणी मतदान केंद्र स्थापन करण्यासाठी पावलं उचलण्याचं आवाहन केलं आहे.

अकरा हजार ग्रंथालयं/कंत्राटी कामगार/दानवे

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सध्या मुंबईत सुरू आहे. आज सहाव्या दिवशी विविध मुद्यांवर विधानपरिषदेत चर्चा करण्यात आली. राज्यात वाचन

चळवळीला चालना देण्यासाठी शासन अनुदानित सुमारे साडे अकरा हजार ग्रंथालयं असून नव्यानं सहा ते सात हजार ग्रंथालयं सुरू करण्यात येणार असल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अरुण लाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. यानुसार आता तीन हजार लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात तसंच ५०० लोकसंख्या असलेल्या आदिवासीबहुल गावात ग्रंथालय सुरू करणं अनिवार्य होणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. राज्य पोलीस दलात कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली पदं ही तांत्रिक आहेत. एकीकडे ही तात्पुरती भरती ११ महिन्यांसाठी करत असतानाच दुसरीकडे ८१ पदांच्या नियमित भरतीच्या प्रक्रियेला मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित पदांच्या भरतीची प्रक्रियाही सुरू आहे, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत दिलं. आमदार रमेश पाटील यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते. भारतीय तटरक्षक दल, नौदल अशा यंत्रणांमधून सेवानिवृत्त झालेल्यांची भरती कंत्राटी तत्त्वावर करण्यात आली आहे, असंही त्यांनी सांगितलं. महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तीन वीज कंपन्यांमधल्या कंत्राटी कामगारांचा तारांकित प्रश्न आमदार श्रीकांत भारतीय यांनी मांडला. या कामगारांना सरकारकडून दिली जाणारी रक्कम आणि कंत्राटदारांकडून त्यांच्यापर्यंत प्रत्यक्ष पोहोचणारी रक्कम यात असलेली तफावत दूर करण्यासाठी काय उपाययोजना सरकार करणार आहे, असं त्यांनी विचारलं. यावर, या कंत्राटी कामगारांचं वेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होते, मात्र नंतरही त्यांच्याकडून पैसे मागितल्याच्या तक्रारी आहेत, त्यावर योग्य कारवाई करू, असं आश्वासन फडणवीस यांनी दिलं. दरम्यान, विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या विनंतीवरून त्यांच्या पावसाळी अधिवेशनातील निलंबनाचा कालावधी ५ दिवसांवरून ३ दिवस इतका करण्यात आला आहे. या प्रस्तावावर विधान परिषदेनं आज एकमताने मंजुरी दिली.

पतसंस्था-विधानसभा

राज्यातील ज्या सहकारी पतसंस्था आणि बँका दिवाळखोरीत जातील आणि ठेवीदारांचे पैसे बुडवतील, त्यातील ठेवीदारांना किमान एक लाख रुपये परत करण्यासाठी स्वतंत्र निधी उभारला जात आहे, अशी माहिती सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सभागृहात दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना हरिभाऊ बागडे यांनी उपस्थित केली होती. पतसंस्थांच्या गैरकारभारामुळे सामान्य ठेवीदारांचे पैसे बुडतात. यामुळे हा स्वतंत्र निधी उभारला जात असून त्यातून ठेवीदारांना दिलासा देण्याचा प्रयत्न सहकार विभाग करीत आहे, असं मंत्री म्हणाले.

प्रवासी राजा दिन

प्रवाशांच्या समस्या तसंच तक्रारी वजा सूचना यांचं स्थानिक पातळीवर जलद गतीनं निराकरण होण्याच्या उद्देशानं राज्य परिवहन महामंडळ - एसटीच्या प्रत्येक आगारात दर सोमवारी आणि शुक्रवारी 'प्रवासी राजा दिन' आयोजित करण्यात येणार आहे. या दिवशी एसटीचे जिल्हा प्रमुख म्हणजे विभाग नियंत्रक एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचना ऐकून घेतील आणि त्या तातडीने सोडवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करतील. एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी ही माहिती दिली.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

ऊस उत्पादक शेतकऱ्याप्रमाणे दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही हमी भाव देण्याबाबत केंद्र सरकार निश्चित सकारात्मक विचार करेल, अशी ग्वाही केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी राज्याचे दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिली. विखे पाटील यांनी शहा यांची दिल्लीमध्ये भेट घेऊन राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे त्यांचं लक्ष वेधलं.

भारतीय संघ मोदी भेट / मुंबईकर खेळाडू

टी-ट्वेंटी विश्वचषक विजेता भारतीय संघ आज मायदेशी परतला असून, या संघाने आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर दुपारी या संघाचं मुंबईत आगमन झालं. मुंबईत मरीन ड्राइव्हवर त्यांची आज विजयी मिरवणूक काढली जाणार असून, वानखेडे मैदानावर विशेष सत्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. दरम्यान, या संघातले रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जयस्वाल हे मुंबईकर खेळाडू उद्या महाराष्ट्र विधान भवनाला भेट देणार आहेत. आमदार प्रताप सरनाईक यांनी आज ही माहिती दिली.

आकांक्षित तालुका

निती आयोगाच्या वतीने आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत संपूर्णता अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या उपस्थितीत यवतमाळच्या झरी जामणी इथं आज झालं. आरोग्य आणि पोषण या क्षेत्रात एकत्रितपणे उत्तम काम करा, असे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. हे अभियान ३० सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत येणारी दर्शके आणि त्यांचा कृती आराखडा जिल्हाधिकारी यांनी चर्चेसाठी घेतला आणि त्या संदर्भात असणाऱ्या प्रशासकीय अडचणींवर कार्यवाही केली. निती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत असणाऱ्या शिक्षण, आरोग्य, कृषी,

उमेद, पशुसंवर्धन इत्यादी विभागांच्या दर्शकांच्या प्रगतीचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. नीती आयोग ४ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान संपूर्णता अभियान राबवणार आहे. या अभियानात देशातल्या ५०० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानामार्फत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे. महाराष्ट्रात अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा या अभियानात समावेश झाला आहे.

सुनील केदार

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक घोटाळा प्रकरणी माजी मंत्री सुनील केदार यांनी दोषसिद्धीला स्थगितीची मागणी करणारी विनंती याचिका गुणवत्ताहीन असल्याचे सांगत आज मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्या.उर्मिला जोशी-फलके यांच्या एकल पीठाने फेटाळून लावली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये 150 कोटींपेक्षा जास्त रकमेचा सरकारी रोखे खरेदी घोटाळा प्रकरणी सुनील केदार यांना 22 डिसेंबर 2023 रोजी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने 5 वर्षे सश्रम कारावास आणि 12 लाख 50 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. केदार यांना राज्यघटनेतील कलम 191(1) आणि लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम 8 (3) अनुसार आमदार म्हणून अपात्र ठरविण्यात आलं होतं. यासंदर्भात विधिमंडळ सचिवालयाने 23 डिसेंबर 2023 रोजी अधिसूचना जारी केली आहे. केदार यांना ही कारवाई रद्द करण्यासाठी दोषसिद्धीला स्थगिती मिळविणे आवश्यक आहे. परंतु ही स्थगिती न मिळाल्यानं आगामी विधानसभा निवडणूक त्यांना लढवता येणार नाही.

सायकल वारी

पंढरीला पायी जाणाऱ्या वारकऱ्यांप्रमाणेच अमरावती सायकल असोसिएशनच्या सदस्यांनी अमरावती-पंढरपूर अशा ६०० किमीच्या सायकल वारीला अंबादेवी आणि एकवीरा देवीचे दर्शन करून काल सकाळी सुरुवात केली. यावेळी त्यांनी वाटेवरील सर्वांना पर्यावरण रक्षण आणि आरोग्यासाठी सायकल चालवण्याचे महत्त्व पटवून देण्याचा निर्धार केला. दररोज १०० किमी आणि शेवटच्या दिवशी २०० किलोमीटरचा प्रवास करत ते ६ जुलैला पंढरपूरला पोहोचणार आहेत.

लाडकी बहीण

यवतमाळ जिल्ह्यात माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीची आज जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की

यांनी ग्रामपंचायतींना भेट देऊन पाहणी केली. महिलांना सध्या ऑनलाईन आणि ऑफलाईन या दोन्ही प्रकारे योजनेसाठी अर्ज सादर करून सहभागी होता येणार आहे. योजनेचे ऑफलाईन अर्ज गावातील अंगणवाडी केंद्र आणि ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याकरिता यवतमाळ जिल्ह्यातील 1 हजार 201 ग्रामपंचायती आणि 3 हजार 20 अंगणवाडी सेविकांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, सुधारित शासन निर्णयानुसार पाच एकरापेक्षा जास्त शेतजमिनीची अट वगळण्यात आली आहे. तसेच अधिवास प्रमाणपत्र नसल्यास त्याऐवजी 15 वर्षापूर्वीचे रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चार पुराव्यापैकी कोणतेही एक ओळखपत्र, ग्राह्य धरण्यात येणार आहे.

हवामान

विदर्भात येत्या आठ जुलैपर्यंत कमी अधिक प्रमाणात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आज वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, इथं तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे, तर नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये कुठलाच सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला नाही. दरम्यान सहा, सात आणि आठ जुलैला विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता असून सतर्कतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, काल रात्रीपासून नागपुरात अधून मधून पाऊस पडत असून, आज सकाळपासून ढगाळ वातावरण आहे.

*****